Walwa Taluka Education Society's

# Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya, Islampur.

## PROCEEDING



**10, 11 OCT. 2015**

U.G.C. Sponsored

Two Day National Conference on

## Progressive Movement in India : Past and Present (Interdisciplinary)

## Progressive Movement in India:
## Past & Present (Interdisciplinary)

**Editor**
**Mr.R.G.Ghule**

**Co-Editor**
**Mrs.V.R.Londhe**

**© All rights reserved Principal, M.V.P.K.Mah. Islampur**

**ISBN: 978-93-81549-95-7**

**© Published by**
**Principal**
**Dr.Ankush Belvatkar**
Malati Vasantadada Patil Kanya Mahavidyalaya,Islampur

**Prienter**
Smita press, Islampur

**Cover and Layout Design**
Mr. Eliyas Jamadar

**October 2015**
**This is published with the financial assistance from University Grant Commission (UGC)**
For Private Circulation Only

**Publisher**
**ABS Publishers, Varanasi - 221 007**
**Ph. 09450540654**
**Email : abspublication@gamil.com**

*The college and Shivaji Vidyapeeth Itihas Parishad do not necessarily share the views expressed the content of the proceeding*

59 स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते स्वरूप 252

प्रा. सागळे बी. के.

60 सत्यशोधक जलसाकार : तातोबा यादव (कासेगावकर) 256

भिंगारदिवे गजानन बाबासाहेब

61 सामाजिक व आर्थिक क्रांतीचे आद्य प्रणेते–राजर्षी छत्रपती शाहू महाराज 261

प्रा.तटाळे पद्माकर बळीराम

62 बहिष्कृत हितकारिणी सभेचे समाजसुधारणा चळवळीतील कार्य 264

डॉ. माधुरी राजाराम खोत.

63 ‘‘संत नामदेवांची महाराष्ट्राबाहेरील भक्ती चळवळ‘‘ 267

दिपक बाबूलाल धोबी

64 **Status Of Gram Panchayat Finance Past And Present** 272

**Mrs. Megha Vijay. Patil**

65 ब्राम्हो समाज–आधुनिक भारताच्या सामाजिक–धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रेरक 277

प्रा.डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते

66 फुले दांम्पत्य : स्त्री मुक्ती चळवळीचे जनक 282

श्रीमती एच.एम बारसकर

67 **Progressive Thoughts of Basaveshwara on Social Justice** 286

**Dr. Nalini Avinash Waghmare**

68 ‘‘स्त्री आंदोलनाचे पूर्वरंग आणि सद्यस्थिती’’ 289

प्रा.कु.नीता निवास कदम.

69 अकबर बादशाह : एक सुधारक नेता 291

प्रा. गित्ते सुनिता हनुमंतराव

70 Sport Activities versus Academic Achievements For Rural Senior College Students from Walwa Taluka. 293

**Dr. Jaysing Shankrrao Patil**

71 Physical Activities versus Academic Achievement For Rural High School Students from Walwa Taluka. 299

**Dr. Narayankar Hemantkumar A.**

ISBN 978-93-81549-95-7

# ब्राम्हो समाज–आधुनिक भारताच्या सामाजिक–धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रेरक

प्रा.डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते
इतिहास विभाग पमुख, असोसिएट प्रोफेसर
यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

**प्रस्तावना -**

19 वे शतक म्हणजे भारतातील प्रबोधनाच्या युगाची सुरूवात होय. आधुनिक भारताच्या इतिहासातील सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रबोधनाचा उदय काळ म्हणून या शतकाकडे पाहिले जाते. शेकडो वर्षे समाजात प्रचलीत असलेल्या अनिष्ट प्रथा, सामाजिक चालीरिती, रूढी–परंपरा, धर्म भोळेपणा, जातीयता, अस्पृश्यता, स्त्रीयांची वाईट स्थिती, सती प्रथा, बाल विवाह, बहुपत्नीकत्व इत्यादी अनेक गोष्टीमुळे सामाजिक प्रगतीला खीळ बसली होती ती दूर सारून राष्ट्राची प्रगती साधण्याची गरज वाटू लागली होती.

पाश्चात्यांच्या आगमनामुळे इंग्रजी विद्या भारतात आल्या, सुशिक्षीत भारतीय समाज आत्मपरीक्षण करू लागला. भारतातदेखील सामाजिक, धार्मिक सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे याची जाणीव कांही प्रबुध्द भारतीयांना झाली. यामध्ये राजाराम मोहन रॉय यांना अग्रस्थान द्यावे लागेल.[1]

भारतीय समाजात वैचारीक जागृती करून नवविचार रूजविण्याचे कार्य राजाराम मोहन रॉय यांनी केले 'मानवतावादी संघटक' व "आधुनीक भारताचे जनक" म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या रॉयनी भारतात ब्राम्हो समाजाची स्थापना करून सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे कार्य हाती घेतले. त्यांनी ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून हिंदु धर्माचे खरे स्वरूप समाजाला दाखवून देण्यासाठी प्रचलीत असलेल्या अनिष्ट प्रथा परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड निरर्थक आहे हे समाजाला पटवून दिले. ख–या धर्मतत्वांची ओळख भारतीयांना करून दिली. आधुनीक भारताच्या इतिहासात ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून सुरू झालेली ही सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ ही हिंदू ध्र्मातील पहिली सुधारणा चळवळ होती. त्यांनतर सर्व भारतीय समाजात परिवर्तनाची लाट आली त्यामुळे भारतात पुढील सुधारणाचा पाया घातला गेला. त्यामुळे ब्राम्हो समाज आधुनीक भारतातील सामा-जिक व धार्मिक सुधारणा चळवळींचा प्रेरक ठरतो[2]. म्हणून प्रस्तुतच्या शोध निबंधात भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीत ब्राम्हो समाजाने केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**व्या शतकापुर्वीची भारताची सामाजिक व धार्मिक परिस्थिती -**

19 व्या शतकापूर्वी भारतीय समाज चैतन्यहीन झाला होता. परंपरावाद श्रेष्ठ होऊन

ISBN 978-93-81549-95-7

बुध्दिस्वातंत्र्य नष्ट झाले होते. समाजातील नैतिक मूल्यांचा –हास झाला होता. अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी, कर्मकांड यानाच खरा धर्म मानले जात होते. मानवता व विवेकशीलता मागे पडली होती समाज गतीहीन झाला होता. अज्ञानरूपी अंधःकारात समाज चाचपडत होता.

याच काळात पाश्चात्यांच्या आगमनामुळे भारतात आधुनीकतेचे वारे वाहू लागले. प्रबोधनाची प्रकिया सुरू होऊन शास्त्रीय दृष्टीकोनाचा विचार समाजात प्रसृत होऊ लागला. बुध्दिप्रामाण्याच्या जोरावर प्रत्येक गोष्ट तपासण्याची वृत्ती काही बुध्दिप्रामाण्यांच्यात निर्माण झाली. अनिष्ट रूढी, परंपराचे निरर्थकत्व लक्षात येऊन नवीन विचार अंगीकारून राष्ट्राचा विकास साधण्याकडे बुध्दिवादयांचा कल झुकू लागला. 19 व्या शतकाच्या प्रारंभी भारतामध्ये प्रबोधनाची प्रकिया सुरू झाली.

**ब्राम्हो समाजाची स्थापना -**

आधुनीक भारतातील प्रबोधन चळवळीचे प्रणेते, म्हणून राजाराम मोहन रॉय यांचा उल्लेख केला जातो. पाश्चात्य विद्या व नवविचाराने ते प्रेरित झाले होते. त्यांनी पाश्चात्य जीवनपध्दती, विचार प्रणाली व भारतीय धर्म पध्दती यांचा तौलनीक अभ्यास केला. भारती यांना ख–या हिंदू धर्माची ओळख पटवून देणे त्यांना गरजेचे वाटू लागले. भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी, हिंदू धर्माला शुध्द स्वरूप देण्यासाठी त्यांनी 20 ऑगस्ट 1828 साली कलकत्ता येथे ब्राम्हो समाजाची स्थापना केली.4

सामाजिक सुधारण चळवळीत ब्राम्हो समाजाचे कार्य –ब्राम्हो समाजाने समाजात चालू असलेल्या अनिष्ट प्रथा, परंपरा वाईट चालीरिती, जातीयता अस्पृश्यता, कर्मकांड स्त्रियांची दयनीय अवस्था या विरूध्द आवाज उठविला व प्रबोधनाची सुरूवात केली.

**स्त्रीउध्दाराचे कार्य -**

तत्कालीन परिस्थितीत स्त्रीयांची अवस्था वाईट होती. वर्षानूवर्षे धर्माच्या नावाखाली समाजाने स्त्रीयांवर अनेक बंधने घातलेली होती. बाल विवाहाची प्रथा, जरठ कुमारी विवाह, बहुपालीकत्व, पडदा पध्दती, कन्याविकय विधवा विवाह अमान्य, सती प्रथा इत्यादी अनिष्ठ प्रथा प्रचलीत होत्या या सर्व गोष्टी विरूध्द ब्राम्हो समाजाने आवाज उठविला व स्त्रीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला.

**सती प्रथेला विरोध -**

पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला जबरदस्तीने सती घालविण्याची अघोरी प्रथा तत्कालीन समाजात होती. या प्रथेच्या विरूध्द त्यांनी आवाज उठविला ही पध्दत धर्मविरोधी आहे हे अनेक धर्मग्रंथाच्या आधारे सिध्द केले 'संवाद कौमुदी' पाक्षिकातून सती प्रथेविरूध्द लिखाण केले.

लिखाणाच्या माध्यमातून जनजागृती करून ही पध्दत बंद व्हावी म्हणून राजाराम मोहन रॉय यांनी सरकारकडे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे तत्कालीन ग. ज. लॉर्ड बेटिंगने 4 डिसेंबर1929 ला ही प्रथा कायदयाने बंद केली त्यामुळे हे वर्ष भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात महत्वाचे वर्ष5 मानले जाते. कारण या कायदयामुळे स्त्रीमुक्ती आंदोलनाला दिशा मिळाली.

स्वातंत्र्योत्तर भारतात 1987 ला सती प्रथेला कार्यक्षमपणे प्रतिबंध होऊन या प्रथेचे

उदात्तीकरण थांबविण्यासाठी कायदा केला गेला. त्याच बरोबर विधवा विवाह, बाल विवाह प्रतिबंध, वारसा हक्क, बालहत्या प्रतिबंध इत्यादी अनेक कायदे पास झाले.6 म्हणजेच 175 वर्षापुर्वी पुरोगामी विचार मांडून कृतीप्रवण असलेले राजाराम मोहन रॉय द्रष्टे समाज सुधारक होते याची प्रचिती येते. स्त्रीयांच्याकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहिले जावे यासाठी ब्राम्हो समाजाने योगदान दिले.

**विधवा विवाह -**

तत्कालीन परिस्थितीत विधवाची अवस्था दयनीय होती. ब्राम्हो समाजाने विधवा पुर्नविवाहाचे समर्थन केले आंतर जातीय विवाह घडवून आणले. संकटात सापडलेल्या कांही विधवांना ब्राम्हो समाजाने आश्रय देवून त्यांचे विवाह घडवून आणून विचारांना कृतीची जोड दिली. पंडित ईश्वरचंद विद्यासागर यांनी बंगाली भाषेतून लिखाण करून विधवा विवाह घडवून आणण्यात पुढाकार घेतला.7 1856 मध्ये विधवांना पुर्नविवाह करण्यात कायदयाने परवानगी देण्यात आली. थोडक्यात ब्राम्हो समाजाने विधवा विवाहाचा पुरस्कार केला.

**विवाहाची वयोमर्यादा -**

बालविवाहाच्या प्रथेमुळे मुलींचे आयुष्य खुरटून जात होते. तेंव्हा 1872 साली मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा 14 वर्षे ठरविणारा 'द नेटिव्ह सिव्हील मॅरेज ॲक्ट'' पास होण्यासाठी केशवचंद्र सेन यांनी प्रचार कार्य केले या कायदयाने बालविवाहावर बंदी घातली व बहुपत्निकत्वाची चाल बेकायदेशीर ठरविली गेली.8

**स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न -**

स्त्रीयांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांना शिक्षण मिळावे म्हणून ब्राम्हो समाजाने स्त्रीशिक्षण प्रसाराचे कार्य केले. स्त्रीयांच्या घरी जाऊन शिक्षण देणे त्याचबरोबर 'सुलभ समाचार' नावाचे साप्ताहिक सुरू केले जास्त व उपयोगी पुस्तके छापण्यासाठी एक संघटना स्थापन करून स्त्रीशिक्षणाला प्राधान्य दिले.9 स्त्रीशिक्षणासाठी 'नॉर्मल स्कूल' व 'व्हिक्टोरिया इन्स्टिटयूट' या संस्था स्थापन करून10 समाजाने स्त्रीशिक्षण प्रसाराचे कार्य केले.

**स्त्रीयांना वारसा हक्क -**

स्त्री पुरूष असा भेदाभेद न मानता स्त्रीयांना समान हक्क मिळाले पाहिजेत त्यांच्या संपत्तीवरील हक्कांसाठी ब्राम्हो समाजाने अखंडपणे लढा दिला.

थोडक्यात भारतीय स्त्रीयांची स्थिती सुधारण्यासाठी सती बंदी, बालविवाह प्रतिबंध, विधवा विवाह, बहुपत्निकत्वास विरोध, स्त्री शिक्षण प्रसार, स्त्रीयांना वारसा हक्क, स्त्रीधन इत्यादी बाबतीत विशेष कार्य करून स्त्रीउध्दाराचे कार्य केले.11 समाजसुधारणेच्या क्षेत्रात प्रथमच संघटीतपणे कार्य करण्याचे श्रेय ब्राम्हो समाजाकडे जाते. भारतीय स्त्रीयांची स्थिती सुधारण्यासाठी ब्राम्हो समाजाने दिलेले योगदान मोलाचे आहे.

**जातीभेदास विरोध -**

तत्कालीन समाज व्यवस्थेत जातीभेद आस्तित्वात होते.उच्च नीचतेच्या कल्पना समाजात रूजलेल्या होत्या. जातीवर आधारीत श्रेष्ठत्व–कनिष्ठत्व ठरविले जात होते. जातीभेदामुळे भारतीयांतील राष्ट्र भावना नष्ट झाली होती. राजाराम मोहन रॉय एका पत्रात म्हणतात, 'अनेक जाती उपजाती निर्माण करणा–या जातीभेदाने हिंदूची राष्ट्र भावना नष्ट केली आहे'.

ISBN 978-93-81549-95-7

ब्राम्हो समाजाने जातीभेदाचे निर्मूलन करण्यासाठी चळवळ उभारली. रॉयनी जाती भेद निर्मूलनाला धार्मीक आधार असल्याचे स्पष्ट करण्यासाठी 'वज्रसूची' नावाच्या संस्कृत ग्रंथाचे भाषांतर केले. थोडक्यात जाती व्यवस्थेसारख्या समाजाला घातक असणा-या पध्दतीविरूध्द ब्राम्हो समाजाने नेटाने प्रचार कार्य केले.12

**शिक्षणप्रसार -**

पाश्चात्यांच्यामुळे भारतामध्ये आधुनिक शिक्षणाचे वारे वाहू लागले होते. तेंव्हा रॉयच्या मते, भारतीयांनी जुन्या विद्या व धर्म ग्रंथाच्या अध्ययनात अडकून न पडता भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, भूगोल पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण घ्यावे त्याच बरोबर धर्मशास्त्रामध्ये जे विचार सांगितलेत ते स्वतःच्या अनुभवावर, बुध्दीवादाच्या व ज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहिले पाहिजेत.13

लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्य यावर आधारलेले पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण भारतीय लोकांना राष्ट्रवादी मार्गाने नेईल असा विश्वास रॉयना होता14 तो पुढे सार्थ ठरला. ब्राम्हो समाजामार्फत इंग्रजी शाळा, महाविद्यालये सुरू करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

**धार्मीक सुधारणा -**

तत्कालीन परिस्थितीत भारता बरोबरच सर्व जगामध्ये संपूर्ण जीवनाला नियंत्रीत करून समाज जीवन व्यापून टाकणारी गोष्ट म्हणजे धर्म होय. धर्माचे प्राबल्य फार मोठे होते. धर्माचा अर्थ 'जो धारण करतो तो धर्म' असा असल्याने यात परिवर्तन किंवा बदल या गोष्टी समाजाला मान्य होणे अशक्य होते.15 तेंव्हा ब्राम्हो समाजाने हिंदू धर्म सुधारणेची चळवळ हाती घेतली.

**मूर्तिपुजा - बहुदेवतावादाला विरोध -**

हिंदू धर्म व्यवस्थेत अनेक देवदेवतांची पूजा केली जात होती. कांही धर्म एकेश्वरवादी होते खिस्ती मिशन-यांकडून हिंदू धर्मावर हल्ले होऊ लागले तेंव्हा भारतीयांना ख-या हिंदू धर्माची ओळख करून देण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. धार्मिक सुधारणेसाठी त्यांनी वेदांचा आधार घेतला. खरा हिंदू धर्म वेद व उपनिषध यात आहे. हिंदू धर्मात नंतर घुसडलेल्या अनिष्ट प्रथा परंपरांनी कर्मकांड, मूर्तिपूजा, बहुदेवतावाद, अंधःश्रध्द इत्यादी बाजूला सारून हिंदू धर्माचे खरे स्वरूप दाखवून देण्याचा प्रयत्न ब्राम्हो समाजाने केला.

**एकेश्वरवादाचा स्वीकार-**

परमेश्वर विश्वाचा निर्माता आहे तो निर्गूण व निराकार आहे हे सांगून तो एकच आहे तेंव्हा त्याची पूजा करणे म्हणजे मानवतेची पुजा करणे ती प्रार्थनेच्या माध्यमातून करण्याला ब्राम्हो समाजाने प्राधान्य देऊन मूर्तिपूजेला विरोध केला. कर्मकांड, अवतार कल्पनेला विरोध करून सर्व धर्मातील ईश्वर एकच असून प्रेमाने, भूतदयेने सदाचाराने बंधु भावाने, नितीमत्तेने सर्व धर्मीय लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण होते हे ब्राम्हो समाजाने सांगितले थोडक्यात धर्म म्हणजे सेवा, परोपकार प्रेम असे मानणारा ब्राम्हो समाज.16 जगातील सर्वच धर्मातील तत्वज्ञानाबद्दल आदर बाळगत होता.

ब्राम्हो समाजाने प्रचलीत रूढी परंपरावर हल्ले चढविले एकेश्वरावादाचा पुरस्कार केला. मूर्तिपूजा, बहुदेवतावाद, अवतार कल्पनेला विरोध केला. आत्म्याचे अमरत्व मानून सेवा प्रेम, परोपकार या मूल्यांचा अंगीकार केला. हिंदू धर्माला लागलेली ओहोटी थांबविण्याचा प्रयत्न

ब्राम्हो समाजाने करून आधुनीक भारताच्या इतिहासात धार्मिक सुधारणा घडवून आणून समाजाला दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.17

**ब्राम्हो समाजाला लाभलेले नेतृत्व -**

राजाराम मोहन रॉय यांच्यानंतर ब्राम्हो समाजाला पंडित रामचंद्र विद्याबागीश,देवेंद्रनाथ ठाकुर, केशवचंद्र सेन, शिवनाथ शास्त्री उमेशचंद्र दत्त, शिवचंद्र दत्त, आनंद मोहन बोस इत्यादींचे नेतृत्व लाभले, 19 व्या शतकाच्या मध्यावर ब्राम्हो समाजातील नेतृत्वाला वैचारीक मतभेद निर्माण झाले. पुढे या समाजाच्या कार्याचा जोम ओसरला पण आधुनीक भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीत ब्राम्हो समाजाने केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.

मूल्यमापन —19 व्या शतकाच्या प्रारंभीचा काळ भारतात प्रबोधनाचा काळ म्हणून ओळखला जातो. पाश्चात्यांच्या आगमनामुळे भारतात नवविचारांचे वारे वाहू लागले. त्यामुळे आपल्याही समाजात सुधारणा करणची गरज काही प्रबुध्द भारतीयचांना वाटू लागली.

भारतात अनेक वर्षे रुढ असलेल्या अनिष्ट प्रथा परंपरा, रूढी, चालीरिती, अंधःश्रध्दा, कर्मकांड, स्त्रीयांची दयनीय सिंती, सती प्रथा, नैतिक मूल्याचा —हास इत्यादीमुळे भारतीय समाजाच्या प्रगतीला खीळ बसली होती ती दूर सारून समाजात सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याचे कार्य ब्राम्हो समाजाने केले. सुधारणा चळवळीव्दारे हिंदू धर्माचे पुन—रूजीवन करण्याचा, शुध्द स्वरू० देण्याचा प्रयत्न ब्राम्हो समाजाने केला.

स्त्रीउध्दाराचे कार्य हाती घेऊन, जातीयता निर्मूलन, शिक्षण प्रसाराचे कार्य नेटाने केले अनिष्टप्रथा परंपरांचे निरर्थकत्व समाजाला पटवून देऊन, पाश्चात्य ज्ञानाचा स्वीकार करून भारतीयांना ख—या धर्मतत्वांची ओळख करून दिली. समाजात आधुनीक विचार रूजविण्याचे कार्य ब्राम्हो समाजाने केले, बहु देवतावाद व मूर्ति पूजेला विरोध करून एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. कर्मकांडापेक्षा प्रेम, सेवा, परोपकार यांचा अंगीकार करून हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.गतीहीन झालेल्या भारतीय समाजाला गतीशील करण्याचे कार्य ब्राम्हो समाजाने केले.

थोडक्यात आधुनीक भारतात वैचारीक जागृती करून सामाजीक व धार्मिक सुधारणा चळवळींनी आमुलाग्र बदल घडवून आणण्याचे श्रेय ब्राम्हो समाजाकडे जाते. आधुनीक भारतात सुधारणा चळवळींचा पाया घालण्याचे काम ब्राम्हो समाजाने केले

**संदर्भ**

1) वैद्य (डॉ.) सुमन, कोठेकर (डॉ.) शांता आधुनीक भारताचा इतिहास
(1857 ते 1920)
प्रकाशक—साईनाथ प्रकाशन नागपूर.
प्रथमावृत्ती सन 1991 पृ. 377

2) देशपांडे प्र. न. —अर्वाचीन भारत (इ.स.1713 ते 1957